# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक ०३/०५/२०२२ (मंगळवार)**

**(सकाळ)**

---

### चोरी

**१) पो.स्टे. खापरखेडा** :– अंतर्गत ०८ कि.मी. अंतरावरील वलनी शिवार येथे दिनांक ०१/०५/२०२२ चे ०२.३० वा. ते ०२.४५ वा. सुमारास अज्ञात आरोपीने वलनी शिवारातील शिवारात असलेले इलेक्ट्रीक पोल वरती डिस्टीबुशन बॉक्स किंमती २०,०००/–रू. चे ॲगल रॉड कापुन चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– केतन ज्ञानेश्वर धोटे, वय २९ वर्ष, रा. गोपालनगर फस्ट बसस्टाप माटे चौक नागपुर यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार नामदेव धांडे मो.नं. ९९२३२७१२४६ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. काटोल** :– अंतर्गत ०२ कि.मी. अंतरावरील शिंदे ले–आउट काटोल येथे दिनांक ०२/०५/२०२२ चे ०३.३० वा. सुमारास फिर्यादी नामे– विजय सदाशिवराव नारनवरे वय ५३ वर्ष रा. शिंदे ले–आउट काटोल हे आपले घरी परीवारासह घरातील हॉल मध्ये झोपी गेले असता आतुन बेडरूम मधुन आवाज आल्याने फिर्यादी हे आत बेडरूम मध्ये जावुन लाईट लावुन बघीतले असता एक अज्ञात आरोपी हा बॅग खोलत होता. त्यास फिर्यादी याने म्हटले की, 'तु कोण आहे' असे म्हणाताच यातील अज्ञात आरोपी हा पळुन गेला. त्यांनतर आलमारी पाहणी केली असता त्यातील सोन्याचे कानातले कि. १५,०००/–रू. व नगदी २,०००/–रू. असा एकुण कि. १७,०००/–रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार जवाहर चव्हान मो न ९५४५३६३१२१ हे करीत आहे.

**३) पो.स्टे. वेलतुर** :– अंतर्गत ०६ कि.मी. अंतरावरील मौजा तारोली येथे दिनांक ३०/०४/२०२२ चे २०.०० वा. ते ०२/०५/२०२२ चे २३.३० वा. सुमारास फिर्यादी नामे– सुभोद आनंदराव घरडे वय ३०वर्श रा. तारोली ता.कुही जि.नागपुर यांचे घरी रिशेपनचा कार्यक्रम असल्यामुळे घरी नातेवाईक असल्याने घराचे दार खुले होते. घरातील लोखंडी गोदरेजचे आलमारीचे दरवाज्याला चाबी लागलेली होती आलमारीचे लॉकरमध्ये ठेवलेले नगदी एकुण ७२,०००/–रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. वेलतुर येथे आरोपीविरुध्द कलम ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक श्री आनंद कविराज मो.क्र. ८८८८२९१२३४ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**